**वैयक्तिक मान्यता तसेच शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र : शालार्थ-१११८/प्र.क्र.३०/टीएनटी-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : १० जून, २०२२.

**वाचा :-**

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२ दि.६/२/२०१२
२)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २४१२/(८१ अ/१२)/ अर्थसंकल्प, दि.७/११/२०१२
३)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएसएन-२०१७/(२०/१७)/टी-२, दि. २३/८/२०१७
४)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शालार्थ १११८/प्र.क्र.३०/१८/टीएनटी-३, दि. २८/०२/२०१८
५)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शालार्थ-१११८/प्र.क्र.३०/१८/टीएनटी-३, दि.२०/०३/२०१९
६)आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. आशिका/१८-१९/शालार्थ/विकृद/आस्था क्र.१४४/२०३१, दि.२९/०३/२०१९.
७)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.सीईटी २०१५/प्र.क्र. १४९/टिएनटी-१, दि.२३.०६.२०१७.

**प्रस्तावना :-**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये तसेच विद्या निकेतने इ. संस्थामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती झाल्यानंतर सदरहू भरती योग्य व नियमानुसार तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने योग्य आहे किंवा कसे, ही तपासणी करुन वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि.०६ फेब्रुवारी, २०१२ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. तसेच राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच जिल्हा परिषद/ महानगरपालिका/ नगर पालिका येथील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते शालार्थ या नवीन प्रणालीद्वारे अदा करण्याबाबत संदर्भ क्र. २ येथील दि. ०७.११.२०१२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आले आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी रिट याचिका क्र.१०१३३/२०१६ मध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबतचा निर्णय संदर्भ क्र. ३ येथील दि.२३.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शालार्थ प्रणालीत नवीन नावे समाविष्ठ करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याबाबत निर्णय सदंर्भ क्र. ४ येथील दि. २८.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला असून, या शासन निर्णयाद्वारे स्थापन करण्यात आलेले विशेष कृतीदल संपुष्टात आणण्याबाबत निर्णय संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे शालार्थ प्रणालीमध्ये नाव नोंदणी करण्याबाबतच्या सर्व समावेशक सूचना संदर्भाधिन क्र.६ येथील दि. २९.०३.२०१९ रोजीच्या आयुक्त,शिक्षण यांच्या पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत.

वैयक्तिक मान्यता देताना तसेच त्या अनुषंगाने शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याबाबत विविध लोक प्रतिनिधीद्वारे, निवेदनांद्वारे तसेच विधानमंडळामध्ये विविध

आयुधांद्वारे चर्चा उपस्थित केल्या आहेत. तसेच मा. उच्च न्यायालयाने देखील अशा विविध प्रकरणांमध्ये वैयक्तिक मान्यता व शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करण्याची कार्यपध्दती सुस्पष्ट, सोपी व सुटसुटीत करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील सिव्हिल ॲप्लीकेशन क्र. ५६२/२०२२ मध्ये दि. ११.०३.२०२२ रोजी दिलेल्या आदेशान्वये वैयक्तिक मान्यता देण्याच्या प्रकरणांमध्ये सुटसुटीतपणा आणण्याच्या अनुषंगाने आदेश दिले आहेत. तसेच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट याचिका क्र. ३१४२/२०२० मध्ये दि. ०३.०८.२०२१ रोजी दिलेल्या निर्देशांनुसार शिक्षक भरतीची कार्यपध्दती पारदर्शक होण्याच्या दृष्टीने दि. २३.०६.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सूचना देण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार वैयक्तिक मान्यता प्रदान करणे तसेच शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक विद्यालये तसेच विद्या निकेतने इ. संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती करण्याबाबत तसेच त्यांना वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याबाबत संदर्भ क्र. १ येथील दि. ०६/०२/२०१२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद सविस्तर धोरणामध्ये खालील नमूद अतिरिक्त बाबींचा समावेश करण्यात येत आहे:-

१.१ पवित्र प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या/ येत असलेल्या/ येणाऱ्या नियुक्त्यांबाबत वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याची आवश्यकता नाही. पवित्र प्रणालीद्वारे नियुक्त झालेल्या उमेदवारांबाबत संबंधित शैक्षणिक संस्थांनी नियुक्ती आदेश निर्गमित केल्यानंतर संबंधित उमेदवाराच्या पदास शासन अनुदान अनुज्ञेय असल्यास त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्याचे नाव शालार्थ प्रणालीत समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव संबंधित संस्थांनी नियुक्ती दिनांकापासून १ महिन्याच्या कालावधीत संबंधित उपसंचालक यांच्या कार्यालयात सादर करावा.

उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ यांचे कार्यालयात सादर करावा.

१.२ वरील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित उपसंचालक यांनी आवश्यक तपासणी करून १ महिन्याच्या कालावधीत संबंधित उमेदवाराचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याबाबत सर्व प्रक्रिया पुर्ण करावी.

१.३ ज्या शैक्षणिक संस्थांना पवित्र प्रणालीद्वारे भरती करण्यापासून वगळण्यात आलेले आहे, अशा पवित्र प्रणाली व्यतिरिक्त होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय दि. ०६/०२/२०१२ मधील तरतुदी तसेच या शासन निर्णयातील तरतुदी बंधनकारक असून, त्यानुसारच वैयक्तिक मान्यता आदेश निर्गमित करावेत.

१.४ या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी पदभरती केलेल्या तथापि या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत प्रदान न केलेल्या वैयक्तिक मान्यतांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-:

i. संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांना लेखी पत्र नोंदणीकृत डाकेद्वारे पाठवून त्यांच्या संस्थेतील ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक

मान्यता अद्यापि प्राप्त झालेली नाही, अशा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव त्याबाबत सर्व आवश्यक माहितीसह ३ महिन्यात सादर करणे आवश्यक राहील, असे कळवावे.

ii. संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांनी हे आदेश निर्गमित झाल्यानंतर १ महिन्याच्या कालावधीत संबंधित शिक्षण संस्थांना उपरोक्त प्रमाणे पत्र निर्गमित करणे आवश्यक राहील. संबंधित शैक्षणिक संस्थांनी सदरहू पत्र प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीत त्यांच्या संस्थांतर्गत ज्या शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव ३ महिन्याच्या कालावधीत संबंधित शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक/विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

iii. सदरहू ३ महिन्यांच्या कालावधीनंतर संबंधित शैक्षणिक संस्थांना या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी भरती केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यांबाबत अथवा शिक्षकांबाबत वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव सादर करता येणार नाही. तसेच, संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक/विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देखील अशा पध्दतीने विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही करणे अनुज्ञेय राहणार नाही.

iv. वरील प्रमाणे संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक/विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयास वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदरहू प्रस्तावाबाबत संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन, त्यानुसार वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावाबाबत अंतिम निर्णय घेणे आवश्यक राहील. सदर प्रकरणामध्ये वैयक्तिक मान्यता प्रदान करणे अथवा वैयक्तिक मान्यता नाकारणे याबाबत कार्यवाही संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक/विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ३ महिन्यांच्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत अशा प्रस्तावांबाबत विहीत मुदतीत निर्णय न घेणे अथवा त्याबाबत वरीष्ठ कार्यालयाकडे मार्गदर्शन मागविणे अनुज्ञेय राहणार नाही. अशा पध्दतीची कार्यवाही करण्यात आली असल्याचे अथवा होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उपसंचालक/संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ यांनी त्याबाबत आवश्यक माहितीसह प्रस्ताव शिक्षण संचालक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील. शिक्षण संचालक यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास, आवश्यक चौकशी/तपासणी करून संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक/विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

v. संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांनी वैयक्तिक मान्यता प्रदान केल्यानंतर संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास/पदास शासन अनुदान अनुज्ञेय होत असल्यास सदर शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक/उपसंचालक यांनी उपसंचालक/संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ यांचेकडे सर्व आवश्यक कागदपत्रांसह १ महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. तसेच संबंधित उपसंचालक/संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा

मंडळ यांनी वरीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिन्याच्या कालावधीत शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याची कार्यवाही पुर्ण करणे बंधनकारक राहील.

**२.१ संदर्भ क्र. १ येथील दि. ०६/०२/२०१२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद विविध तरतुदींबाबत खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात येत आहे:-**

| अ. क्र. | मुद्दा | कालावधी | दि. ०६/०२/२०१२ च्या शासन निर्णयातील मुद्दा |
|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त शिक्षकांच्या यादीमधून सुयोग्य व्यक्तिची शिफारस करण्याकरीता | १ महिना | अ (१), ब (२) |
| २ | शिफारस प्राप्त व्यक्तिची रिक्त पदावर समावेशनाद्वारे नियुक्ती करणे. | १ महिना | अ (१), ब (२) |
| ३ | संस्थेस संबंधित रिक्त पद सरळसेवेद्वारे भरण्यास परवानगी देणे. | १ महिना | अ (३) |
| ४ | संस्थेस जाहिरातीच्या मसुद्यास मान्यता देणे. | १ महिना | अ (४), ब (३) |
| ५ | पदभरती झाल्यानंतर त्यांना वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही करणे. | १ महिना | ब (५ ते ९) |
| ६ | वैयक्तिक मान्यतेनंतर शालार्थ प्रणालीमध्ये नाव नमूद करण्याचा प्रस्ताव विहीत प्राधिकारीकडे सादर करणे. | १५ दिवस | - |
| ७ | प्राप्त शालार्थ प्रस्तावास मान्यता देणे. | १ महिना | - |

२.२ पवित्र प्रणालीद्वारे होणा-या भरती प्रकियेव्यतिरिक्त होणा-या भरती प्रकरणांमध्ये जाहिरातीच्या मसूद्यास मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर संबंधित शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद/शिक्षण निरिक्षक/शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित पदाबाबतची बिंदूनामावली संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणी करुन घेतली आहे किंवा कसे याबाबतीत खात्री करुन त्यानंतर सदरहू रिक्त पद भरतीकरिता सोबत जोडलेल्या विवरणपत्र “ब” येथे नमूद संबंधित विभागातील सर्वाधिक खपाच्या २ वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्याची परवानगी दयावी. सदरहू परवानगी देताना जाहिरातीच्या मसूदयामध्ये विवरणपत्र अ नुसार सर्व तपशिल नमूद असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद/शिक्षण निरिक्षक/शिक्षण उपसंचालक यांनी करावी.

२.३ सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत बिंदूनामावलीची पडताळणी न करता/जाहिरातीची परवानगी न घेता, अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समावेशन न करता संस्थेने परस्पर केलेल्या नेमणुकांना मान्यता देण्यात येवू नयेत. अशा परिस्थितीत संबंधित शैक्षणिक संस्थेद्वारे/ व्यवस्थापनाद्वारे करण्यात आलेली नेमणूक ही बेकायदेशीर असून, अशा बेकायदेशिर नियुक्ती प्रक्रियेद्वारे नियुक्त केलेल्या उमेदवारांना वेतन व भत्ते/ मानधन देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेची/व्यवस्थापनाची राहील. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरिक्षक/शिक्षण उपसंचालक यांनी अशा प्रकरणांमध्ये सर्व तपासणी करून त्यानुसार आदेश निर्गमित करावेत व त्याबाबत अहवाल संचालकांमार्फत आयुक्त, शिक्षण यांना सादर करावा.

२.४ वरील प्रमाणे जाहिरात देण्याची परवानगी दिल्यानंतर संस्थेने सदरहू रिक्त पद भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करुन त्यानुसार भरती प्रक्रिया राबवावी. तथापि, सदर भरती प्रक्रिया जाहिरातीतील तपशिलानुसार राबविण्याची जबाबदारी पुर्णत: संबंधित शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापनाची राहील. संस्थेने जाहिरात देऊन त्यानंतर प्रत्यक्ष पदभरती केल्यावर जाहिरातीतील वस्तुस्थितीशी विसंगत पध्दतीने भरती प्रक्रीया राबवली असल्यास अथवा सदर भरतीप्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित रिक्त पदावर नियुक्त कर्मचाऱ्यास वैयक्तिक मान्यता प्रदान करता येणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित नियुक्त उमेदवारास वेतन व अनुषंगिक लाभ देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची/व्यवस्थापनाची राहील. याबाबतचा कोणताही आर्थिक भार राज्य शासनावर येणार नाही.

उपरोक्त तरतुदीनुसार प्रवेश प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याबाबत प्रस्ताव संबंधित संस्थेने ३० दिवसांच्या आत संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद / शिक्षण निरीक्षक/उपसंचालक यांचेकडे सादर करावा. त्यानुसार संबधित प्राधिकारी यांनी १ महिन्याच्या कालावधीत संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास वैयक्तिक मान्यता प्रदान करावी तसेच वैयक्तिक मान्यता प्रदान केल्यानंतर संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी अथवा पदास शासन अनुदान अनुज्ञेय असल्यास त्याचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक/ उपसंचालक यांनी १५ दिवसात संबंधित प्राधिकारी यांचेकडे सादर करावा. त्यानुसार शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिन्याच्या कालावधीत संबंधित प्राधिकारी यांनी शालार्थ प्रणालीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याचे/ शिक्षकाचे नाव समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही पुर्ण करावी.

२.५ दि. ०६/०२/२०१२ च्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच या शासन निर्णयामध्ये नमूद कार्यपध्दतीचा अवलंब न करता करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेस संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपसंचालक यांनी वैयक्तिक मान्यता दिल्याचे निदर्शनास आल्यास शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक) यांनी संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपसंचालक यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत प्रस्ताव विहीत कार्यपध्दतीनुसार सादर करावा. तसेच सदरहू वैयक्तिक मान्यतेच्या अनुषंगाने शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपसंचालक यांच्या वेतनातून वसूल करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक व माध्यमिक) यांची राहील. तसेच अशा पध्दतीने वैयक्तिक मान्यता प्रदान करणाऱ्या शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपसंचालक यांची अकार्यकारी पदावर बदली करण्याचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांनी शासनास सादर करावा. अशा पध्दतीने अकार्यकारी पदावर बदली करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांनी सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन त्याबाबतीत प्रस्ताव शासनास सादर करावा. त्याचप्रमाणे संबंधित शैक्षणिक संस्थेने/व्यवस्थापनाने या शासन निर्णयातील अथवा संदर्भाधिन क्र. १ येथील दि.०६.०२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीशी विसंगत कार्यपध्दती राबवून भरती प्रक्रिया राबविली असल्याचे स्पष्ट होत असल्यास संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद/ शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपसंचालक यांनी विहित कार्यपध्दतीनुसार त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण यांना सादर करावा. अशा पध्दतीने प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आयुक्त, शिक्षण यांनी त्याप्रमाणे सर्व कागदपत्रांची तपासणी करुन तसेच संबंधित शैक्षणिक संस्थांना/व्यवस्थापनांना त्यांचे म्हणणे/बचाव मांडण्याची सुयोग्य संधी देवून त्यानुसार अंतिम निर्णय प्रदान करणे आवश्यक राहील. अशा पध्दतीने

चौकशी अंती संबंधित शैक्षणिक संस्थांनी/व्यवस्थापनांनी विहित कार्यपध्दतीनुसार भरती प्रक्रिया राबविली नसल्याचे स्पष्ट झाल्यास, संबंधित शाळेची मान्यता रद्द करणे अथवा अन्य कठोर शिक्षा अथवा संबंधित पद काही कालावधीकरीता/ कायमस्वरुपी व्यपगत करण्याचा अधिकार आयुक्त, (शिक्षण) यांना राहील. आयुक्त, (शिक्षण) यांनी त्यानुसार आदेश निर्गमित केल्यानंतर संच मान्यतेनुसार वाढीव पद अनुज्ञेय होत असले तरी त्यास कोणत्याही परिस्थितीत मान्यता देण्यात येणार नाही.

**३. शालार्थ प्रणालीमध्ये नाव नोंदविण्याबाबत करावयाची कार्यवाही :-**

संबंधित उपसंचालक यांच्याकडे दाखल झालेल्या शालार्थ प्रणालीमध्ये नाव नोंदविण्याबाबतच्या प्रकरणांमध्ये खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

३.१ शालार्थ प्रणालीमध्ये नाव नमूद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावाच्या तसेच प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन संबंधित प्रकरणी यापूर्वी प्रदान करण्यात आलेली वैयक्तिक मान्यता चुकीची, अयोग्य व बेकायदेशिर असल्याचे संबंधित शिक्षण उपसंचालक यांचे प्रथमदर्शनी मत होत असल्यास त्यांनी त्यानुसार अंतरिम आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. सदर अंतरिम आदेशामध्ये प्रकरणातील वैयक्तिक मान्यता कोणत्या शासन निर्णयांच्या/ कागदपत्रांच्या आधारे चुकीची आहे, अशी त्यांची धारणा झाली आहे ती कारणे /कागदपत्रे सुस्पष्टपणे नमूद करुन सदरहू प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात येत असल्याचे सुस्पष्टपणे सदर अंतरिम आदेशामध्ये नमूद करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सदरहू सविस्तर चौकशी पूर्ण होईपर्यंत शालार्थ प्रणालीत नवीन नाव समाविष्ट करण्याचा प्रस्ताव प्रतिक्षाधिन ठेवावा. वरीलप्रमाणे विवक्षीत प्रकरणामध्ये सविस्तर चौकशी करण्याकरीता संबंधित कर्मचारी, संबंधित शाळा व्यवस्थापन/शैक्षणिक संस्था तसेच सदरहू प्रकरणात वैयक्तिक मान्यता प्रदान करणारे प्राधिकारी यांना सुनावणीकरीता नोटीस देऊन, त्यांचे म्हणणे ऐकून घेवून त्यानुसार सविस्तर आदेश पारीत करणे आवश्यक राहील. सदर प्रकरणी सविस्तर चौकशीअंती संबंधित कर्मचाऱ्यास प्रदान केलेली वैयक्तिक मान्यता योग्य असल्याची संबंधित शिक्षण उपसंचालक यांची खात्री झाल्यावर त्यानुसार संबंधित शिक्षण उपसंचालक हे त्याबाबतची कारणे सुस्पष्टपणे नमूद करुन आदेश निर्गमित करतील व त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्याचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये नोंदविण्याबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण करतील. तथापि, सविस्तर चौकशीमध्ये संबंधित प्रकरणामध्ये देण्यात आलेले वैयक्तिक मान्यता आदेश हे चुकीचे व बेकायदेशीर असल्याची शिक्षण उपसंचालक यांची खात्री झाल्यास, त्यानुसार सुस्पष्ट कारणे नमूद करुन स्वयंस्पष्ट आदेश पारीत करणे आवश्यक राहील. अशा प्रकरणामध्ये चुकीच्या पध्दतीने वैयक्तिक मान्यता आदेश प्रदान केल्याबाबत सदरहू वैयक्तिक मान्यता आदेश प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षण संचालक यांच्या मार्फत राज्य शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

३.२ शालार्थ प्रणालीच्या प्रस्तावामध्ये संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात आलेली वैयक्तिक मान्यता संदर्भाधिन क्र. १ येथील दि. ०६.०२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी प्रदान केलेली असल्यास अशा प्रकरणांमध्ये संदर्भाधिन क्र. ३ येथील दि.२३.०८.२०१७ रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार केवळ Fraud, Misrepresentation or Suppression of Facts मुळे सदरहू वैयक्तिक मान्यता चुकीची असल्याचे संबंधित शिक्षण उपसंचालक यांची धारणा झाल्यास त्यानुसार त्यांनी परिच्छेद क्र. ३.१ येथे नमूद कार्यपध्दती नुसार सुनावणीद्वारे सर्व संबंधिताना त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य संधी प्रदान करुन

त्यानंतरच याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक राहील. तथापि, अशा प्रकरणांमध्ये Fraud, Misrepresentation or Suppression of Facts या मुद्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव वैयक्तिक मान्यता रद्द करता येणार नाही.

**३.३** तथापि, शालार्थ प्रणालीत नाव नोंदविण्याबाबत प्राप्त प्रकरणांमध्ये देण्यात आलेले वैयक्तिक मान्यता आदेश संदर्भाधिन क्र.१ येथील दि. ०६.०२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर निर्गमित केले असल्यास, सदर प्रकरणांमध्ये उक्त दि.०६.०२.२०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन झाले असल्याची खात्री संबंधित शिक्षण उपसंचालक यांनी करणे आवश्यक राहील. त्यानुसार आवश्यकता भासल्यास वर परिच्छेद क्र. ३.१ येथे नमूद कार्यपध्दती नुसार सुनावणीची कार्यपध्दती अंगीकारुन त्यानुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**३.४** उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेबाबत उपरोक्त अ ते इ ची कार्यवाही संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ हे करतील.

**३.५** संबंधित विभागाच्या विभागीय परीक्षा मंडळाच्या अध्यक्ष पदाचा कार्यभार अतिरिक्तरित्या जर संबंधित विभागाचे विभागीय उप संचालक यांचेकडे असल्यास उपरोक्त ई मध्ये नमूद केलेली कार्यवाही नजिकच्या विभागीय अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ यांचेकडे देण्यात येईल, त्याबाबतचे आदेश आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावरून त्यांनी निर्गमित करावेत.

कोणत्याही परिस्थितीत शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही २ महिन्याच्या कालावधीत पुर्ण करण्यात यावी. तथापि विविक्षित प्रकरणांमध्ये अंतरीम आदेशाद्वारे सविस्तर चौकशी करावयाची झाल्यास, सदरहू चौकशीची कार्यवाही २ महिन्यात पुर्ण करून त्या पुढील १ महिन्यात शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याच्या प्रस्तावावर अंतिम कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०६१०१७२९१९७२२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sameer Anant Sawant
Date: 2022.06.10 17:32:31 +05'30'

**( समीर सावंत )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई
५. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई
६. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

७. महालेखापाल, ( लेखा परीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
८. महालेखापाल, ( लेखा अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी
१०. आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. शिक्षण संचालक ( प्राथमिक ) , महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. संचालक, विद्यापरिषद, पुणे
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१६. सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक ( माध्यमिक / प्राथमिक )
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक)
१९. वित्त विभाग ( व्यय-५ ), मंत्रालय, मुंबई
२०. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती-टिएनटी-३.

**विवरणपत्र-"अ"**

**वैयक्तिक मान्यता देताना तपासावयाच्या बाबी**

**नियुक्त कर्मचाऱ्यांचे नावः-**
**पदनामः-**

| अक्र. | तपशील | संस्थेने भरावयाची माहिती. |
|---|---|---|
| १ | पद रिक्त/ निर्मिती होण्याचे कारण:- कर्मचाऱ्यांच्या नावासह (सेवानिवृत्ती/ राजीनामा/मृत्यु /रजा/वाढीव पद व इतर) राजीनाम्यामुळे पद रिक्त झाल्यास राजीनाम्याची प्रत व तो मंजूर केल्याचा संस्थेचा ठराव व प्रत सोबत जोडावी. | |
| २ | **(अ)पदाचा तपशील** (संच मान्यतेनुसार मान्य/प्रस्तावित वाढीव पद) प्रत जोडली आहे/ नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| | **(ब) पदाचा तपशील** (पुर्णवेळ/अर्धवेळ/अंशकालीन (घडयाळी तास)/ रजा कालावधी (कालावधी व रजेवर गेलेल्या कर्मचाऱ्याचे नाव नमूद करावे.) | |
| | **(क) पदाचा तपशील** अनुदानित/अंशत: अनुदानित/विना अनुदानित/ कायम विना अनुदानित | |
| ३ | प्रस्तावासोबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेल्या बिंदु नामावली (रोस्टर) ची प्रत सोबत जोडली आहे/नाही. असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| ४ | पदाचे मानधन/ वेतनश्रेणी | |
| ५ | जाहिरातीचा दिनांक व वर्तमानपत्राचे नाव कात्रण जोडले आहे /नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| ६ | शाळा समिती/समन्वय समितीचा ठराव जोडला आहे/ नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| ७ | निवड समितीचा अहवाल जोडला आहे / नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| ८ | निवड झालेल्या कर्मचाऱ्याचे नियुक्ती आदेश पृष्ठ क्रमांक (पोच असलेले) | |

| | | **पदासाठी आवश्यक अटी व शर्ती** | **नियुक्त उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व इतर बाबी** |
|---|---|---|---|
| ९ | संबंधित पदासाठी विहीत वयोमर्यादा (किमान व कमाल) (खुला/मागास) | | |
| १० | पदासाठी विहीत शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता (विषय मध्ये) | | |
| ११ | प्रवर्ग(वैधानिक)<br>अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र. , इ.मा. व., खुला | | |
| १२ | प्रवर्ग (सामाजिक) समांतर<br>(दि. ०७.११.२००९ च्या शासन निर्णयानुसार) | | |
| १३ | पदासाठी आवश्यक कार्यभार व नियुक्त कर्मचाऱ्यास उपलब्ध कार्यभार (विषय व माध्यम) | | |

**प्राचार्य/मुख्याध्यापकाची सही.**

## विवरणपत्र-"ब"

## शासनमान्य जाहिरात यादीवरील महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक खपाची वृत्तपत्रे

| अ.क्र. | जिल्हा | वृत्तपत्राचे नाव | भाषा | नियतकालिकता | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | नवाकाळ | मराठी | दैनिक | मोठे |
| | | महाराष्ट्र टाईम्स | मराठी | दैनिक | मोठे |
| | | टाईम्स ऑफ इंडिया | इंग्रजी | दैनिक | मोठे |
| | | हिंदुस्थान टाईम्स | इंग्रजी | दैनिक | मोठे |
| | | नवभारत | हिंदी | दैनिक | मोठे |
| | | नवभारत टाइम्स | हिंदी | दैनिक | मोठे |
| २ | ठाणे | पुण्यनगरी | मराठी | दैनिक | मोठे |
| | | बहुजनरत्न लोकनायक | मराठी | दैनिक | मध्यम |
| ३ | पालघर | महासागर | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | डहाणू टाईम्स | मराठी | दैनिक | मध्यम |
| ४ | रायगड | कृषिवल | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | रत्नागिरी टाईम्स | मराठी | दैनिक | मध्यम |
| ५ | पुणे | सकाळ | मराठी | दैनिक | मोठे |
| | | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| ६ | अहमदनगर | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | पुण्यनगरी | मराठी | दैनिक | मध्यम |
| ७ | सोलापूर | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | दिव्य मराठी | मराठी | दैनिक | मध्यम |
| ८ | नाशिक | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | दिव्य मराठी | मराठी | दैनिक | मोठे |
| ९ | धुळे | पुण्यनगरी | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | वार्ता | मराठी | दैनिक | लघु |
| १० | नंदूरबार | नंददर्शन | मराठी | दैनिक | लघु |
| | | नंदूरबार दिनांक उत्तर महाराष्ट्र | मराठी | दैनिक | लघु |
| ११ | जळगांव | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | दिव्य मराठी | मराठी | दैनिक | मोठे |
| १२ | कोल्हापूर | सकाळ | मराठी | दैनिक | मोठे |
| | | पुढारी | मराठी | दैनिक | मोठे |
| १३ | सातारा | सकाळ | मराठी | दैनिक | मोठे |
| | | पुढारी | मराठी | दैनिक | मध्यम |
| १४ | सांगली | दक्षिण महाराष्ट्र केसरी | मराठी | दैनिक | मध्यम |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ललकार | मराठी | दैनिक | मध्यम |
| १५ | रत्नागिरी | रत्नागिरी टाईम्स | मराठी | दैनिक | मोठे |
| | | प्रहार | मराठी | दैनिक | मध्यम |
| १६ | सिंधुदूर्ग | प्रहार | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | रत्नागिरी टाईम्स | मराठी | दैनिक | लघु |
| १७ | औरंगाबाद | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | सकाळ | मराठी | दैनिक | मोठे |
| १८ | जालना | दुनियादारी | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | रामविचार | मराठी | दैनिक | मध्यम |
| १९ | बीड | झुंजार नेता | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | मराठवाडा साथी | मराठी | दैनिक | मध्यम |
| २० | परभणी | गाववाला | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | गोदातीर समाचार | मराठी | दैनिक | मध्यम |
| २१ | हिंगोली | गाववाला | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | पूरोगामी विचारांचे एकमत | मराठी | दैनिक | मध्यम |
| २२ | लातूर | पुण्यनगरी | मराठी | दैनिक | मोठे |
| | | पूरोगामी विचारांचे एकमत | मराठी | दैनिक | मध्यम |
| २३ | उस्मानाबाद | संघर्ष समाजवादाचा | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | पूरोगामी विचारांचे एकमत | मराठी | दैनिक | मध्यम |
| २४ | नांदेड | पुण्यनगरी | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | प्रजावाणी | मराठी | दैनिक | मध्यम |
| २५ | अमरावती | पांचजन्य | मराठी | साप्ताहिक | मोठे |
| | | विदर्भ मतदार | मराठी | साप्ताहिक | मोठे |
| | | नवभारत | हिंदी | दैनिक | मध्यम |
| | | जन माध्यम | मराठी | दैनिक | मध्यम |
| २६ | अकोला | देशोन्नती | मराठी | दैनिक | मोठे |
| | | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| २७ | वाशिम | मातृभूमी | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | सायरन | मराठी | दैनिक | मध्यम |
| २८ | यवतमाळ | लोकदूत | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | नमो महाराष्ट्र | मराठी | दैनिक | मध्यम |
| २९ | बुलढाणा | देशोन्नती | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | मातृभूमी | मराठी | दैनिक | लघु |
| ३० | नागपूर | लोकमत | मराठी | दैनिक | मोठे |
| | | नवभारत | हिंदी | दैनिक | मोठे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१ | वर्धा | श्रमिक संघर्ष | मराठी | सांज दैनिक | मध्यम |
| | | जनसंग्राम | मराठी/हिंदी | दैनिक | मध्यम |
| ३२ | भंडारा | भंडारा पत्रिका | मराठी | दैनिक | मध्यम |
| | | ग्रामीण समाचार | मराठी | दैनिक | लघु |
| ३३ | गोंदिया | दिशाप्रवाह | मराठी/हिंदी | दैनिक | मध्यम |
| | | भंडारा पत्रिका | मराठी | दैनिक | लघु |
| ३४ | चंद्रपूर | नवभारत | हिंदी | दैनिक | मोठे |
| | | महाविदर्भ | मराठी | दैनिक | मध्यम |
| ३५ | गडचिरोली | महासागर | मराठी | दैनिक | लघु |
| | | ध्वनीलहरी | मराठी | सांज दैनिक | लघु |

*****